**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२०/२०२०-२१/०५/वेतनपथक, पुणे दिनांक - ०६ जुलै, २०२१

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

२. कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

**विषय - माहे जुलै, २०२१ ची वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्याबाबतची कार्यवाही.**

या विभागाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये तसेच अकृषी व अभिमत विद्यापीठे यांमधील शासन मान्य/अनुज्ञेय पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांनी माहे जुलै या महिन्याच्या वेतनवाढीचा पर्याय स्विकारला आहे त्यांना जुलै, २०२१ या महिन्याच्या वेतनवाढीचे परिगणन कशाप्रकारे करावे याबातच्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

माहे जुलै, २०२१ ची वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्याबाबत खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. प्रथम संबंधीत महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठांनी जे कर्मचारी माहे जुलै, २०२१ ची वार्षिक वेतनवाढ घेण्यास पात्र आहेत त्यांचे नावे आदेश निर्गमीत करावयाचे आहेत. या आदेशामध्ये सर्वसाधारणपणे खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. **जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतन घेतात आणि जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सातव्या वेतन आयोगामध्ये वेतन घेत आहेत त्यांचेसाठी स्वतंत्र आदेश काढण्यात यावेत.**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | माहे जून २०२१ चे वेतन | माहे जून २०२१ चे ग्रेड वेतन | एकूण वेतन जून, २०२१ (३ + ४) | वेतनवाढीचा दिनांक | वेतनवाढीची रक्कम (रकाना क्र.५ च्या) | वेतनवाढ दिल्यानंतर ०१/०७/२०२१ चे वेतन (५ + ७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

२. यानंतर HTE Sevaarth प्रणालीमध्ये Login करुन **Worklist => Pay roll => Employee Information => Release of Annual Increment** हा पाथ निवडावा. सदरहू पाथ निवडल्यानंतर आपल्या स्क्रीनवर **Add New Order** असा **Tab** दिसेल त्यावर **Click** करावे. त्यावर **Click** केल्यानंतर आपल्या **Screen** वर **Increment Certificate Order No** आणि **Order Date** दिसेल. आपल्या महाविद्यालयाने/ विद्यापीठाने महाविद्यालयातील/विद्यापीठातील ज्या कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्याचे आदेश निर्गमीत केलेले असतील त्या आदेशाचा क्रमांक **Increment Certificate Order No** पुढील चौकोनामध्ये आणि ज्या दिवशी आपण वार्षिक वेतनवाढीचे आदेश निर्गमीत केलेले आहेत तो दिनांक **Order Date** मधील चौकोनामध्ये नमूद करावा. हे नमूद केल्यानंतर आपल्या स्क्रीनसमोर **Bill Name Select** व **Pay Commission Select** असे २ **Options** दिसतील. यापैकी **Bill Name** च्या समोर असलेल्या **Select** बटनावर **Click** केल्यानंतर आपल्यासमोर **Bill Group** दिसेल. आपण ज्या **Bill Group** मध्ये प्रत्येक महिन्याचे वेतन देयक तयार करतो तोच **Bill Group** येथे निवडावा. **Bill Group** निवडल्यानंतर **Pay Commission** च्या समोर असलेल्या **Select** बटनावर **Click** केल्यानंतर आपल्यासमोर जे **Options** येतात **<u>त्यापैकी जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ६ व्या वेतन आयोगामध्ये वेतन घेतात त्यांचेसाठी Sixth Pay Commission आणि जे शिक्षकेतर कर्मचारी ७ व्या वेतन आयोगामध्ये वेतन घेतात त्यांचेसाठी Seventh Pay Commission हा पर्याय निवडावा. त्यानंतर Go या बटनावर Click करावे.</u>**

**Go** या बटनावर **Click** केल्यानंतर आपल्या **Screen** वर **List of Employees due for Increment** व **List of Employees release for Increment** असे २ **columns** दिसतील. तसेच या दोन्ही **columns** च्या मध्ये **Add to List** व **Remove** असे दोन **Tab** दिसतील. उपरोक्त दोन्हीही **columns** पैकी पहिल्या **column** मध्ये **(List of Employees due for Increment)** आपल्या वर नमूद केलेल्या आदेशामध्ये ज्या कर्मचा-यांचा समावेश आहे त्यांचे नावे शोधून त्याचे शेजारी असलेल्या चौकोनामध्ये **Click** करण्यात यावे. आपण सदरहू चौकानामध्ये **Click** केल्यानंतर **√** अशी खूण येईल. अशा सर्व कर्मचा-यांना निवडल्यानंतर **Add to List** या **Tab** वर **Click** करावे. असे केल्यानंतर आपण **List of Employees due for Increment** मधील जे कर्मचारी निवडले आहेत ते सर्व कर्मचारी **List of Employees release for Increment** या **column** मध्ये दिसतील. आपल्या महाविद्यालये/विद्यापीठातील सर्व कर्मचा-यांची नावे **List of Employees release for Increment** मध्ये आलेली आहेत याची खात्री पटल्यानंतर या **column** च्या खालील असलेल्या **Save** या **Tab** वर **Click** करावे.

**Save** या **Tab** वर **Click** केल्यानंतर **Annual Increment has been forwarded successfully for verification** असा संदेश आपल्या **Screen** वर येईल. हा संदेश आल्यानंतर **Go** या बटनावर **Click** करण्यात यावे. **Go** या बटनावर **Click** केल्यानंतर **1. Increment Order No. 2. Order Date, 3. No. of Employees in Order 4. Status** असे **columns** आपल्या समोर येतील. त्यानंतर

**Print Report** यावर **Click** करावे. **Print Report** यावर **Click** केल्यानंतर **Increment Certificate** आपल्याला दिसेल. यामध्ये दिनांक ०१.०७.२०२१ रोजीची **Pay Band + Grade Pay/Academic Grade Pay** अथवा सातव्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक्सनुसार ची एकत्रीत रक्कम रकाना क्रमांक ०३ मध्ये दिसेल आणि त्यानंतर वार्षिक वेतनवाढीची रक्कम रकाना क्रमांक ०५ मध्ये दिसेल. त्यानंतर वार्षिक वेतनवाढ मंजूर केल्यानंतरची **Pay Band + Grade Pay/Academic Grade Pay** अथवा सातव्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक्सनुसार याची एकत्रीत रक्कम रकाना क्रमांक ०७ मध्ये दिसेल. रकाना क्रमांक ०७ मधील रक्कम आणि आपण काढलेल्या आदेशाची रक्कम तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. यांनतर **Print Report** ची **Print** काढून नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथील आर्टस बिल्डींगमधील खोली क्रमांक ४ येथे खाली नमूद केलेल्या तारखांना सादर करावी.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ०८ जुलै, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | ०८ जुलै, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | अहमदनगर | ०९ जुलै, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| ४ | नाशिक | ०९ जुलै, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |

जे कर्मचारी त्यांच्या **Pay Band** मध्ये अंतिम टप्प्यामध्ये गेलेले आहेत त्यांच्या जुलै २०२१ चे **Increment** चे परिगणन होणार नाही किंवा त्यांचे परिगणन **Pay Band च्या कमाल मर्यादेपर्यंत होईल याची कृपया नोंद घ्यावी.**

जे कर्मचारी दिनांक ३० जून, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांचा समावेश माहे जुलै, २०२१ च्या Increment मध्ये करण्यात येऊ नये. (म्हणजेच त्यांना Detach करुन ठेवावे).

तरी वरील सर्व सूचना लक्षात घेऊन याबाबतची पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२१/२०२१-२२/०५/वेतनपथक, पुणे दिनांक- ०६ जुलै, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर सस्था, पुणे

**विषय - १. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत.**

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत.**

**१. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणेबाबत -**

या विभागाच्या अधिपत्याखालील ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये नव्याने कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत व त्यांची वेतननिश्चिती सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग पुणे यांनी करुन त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे त्यांच्या टेम्प्लेट ४ ला मान्यता देण्यासाठी ज्या महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये शासन मान्य पदावर कर्मचा-यांच्या नव्याने नियुक्त्या झालेल्या आहेत फक्त अशाच महाविद्यालये/ अकृषी व अभिमत विद्यापीठातील संबंधीत कर्मचा-यांची माहिती टेम्प्लेट ४ मध्ये भरुन या कार्यालयास फॉरवर्ड करावी व अशा नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबतच्या सर्व कागदपत्रांसह आणि टेम्प्लेट ४ सह **खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत -**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की माहे जून, २०२१ मध्ये ब-याच महाविद्यालयांमधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा बदल्या झालेल्या आहेत. त्यामुळे अशा सर्व कर्मचा-यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन त्याप्रमाणे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये योग्य ते बदल

करण्यासाठी खालील विवरणपत्रामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती आणि सर्व संबंधीत कागदपत्रांसह **(पीडीएफ) खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे. तसेच संबंधीत कर्मचा-यांना एचटीई सेवार्थ प्रणालीमधून Detach करण्यात यावे.**

**माहे जुलै, २०२१ या महिन्यामध्ये झालेल्या बदलींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

**अ) आपल्या महाविद्यालयामधून इतर महाविद्यालयांमध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Relieving | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**ब) इतर महाविद्यालयांमधून आपल्या महाविद्यालयामध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Joining | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत -**

ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कॅस मान्य केल्यामुळे/पदोन्नती झाल्यामुळे अथवा इतर कोणत्याही बाबीमुळे वेतननिश्चिती/सुधारित वेतननिश्चिती झालेली आहे व त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे वेतनामध्ये फरक होत असल्यास त्या अनुषंगानेची माहिती खालील विवरणपत्रामध्ये मायक्रोसॉफ्ट एक्सेलमध्ये सादर करुन याबाबतच्या वेतननिश्चितीच्या मूळप्रतीसह **खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे.**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Reason |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण वरील बाबींवरील आपले प्रस्ताव नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथील आर्टस बिल्डींगमधील खोली क्रमांक ४ येथे खाली नमूद केलेल्या तारखांना सादर करावेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ०८ जुलै, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | ०८ जुलै, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | अहमदनगर | ०९ जुलै, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| ४ | नाशिक | ०९ जुलै, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे

**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२१/२०२१-२२/०५/वेतनपथक, पुणे दिनांक- ०६ जुलै, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - अर्जित रजा रोखीकरण, तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधन याबाबतची माहिती सादर करणेबाबत.**

**अ) अर्जित रजा रोखीकरण -** या विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अर्जित रजा रोखीकरणाचे आदेश निर्गमीत केलेले आहेत परंतू अजूनही त्याचे प्रदान झालेले नाही अशा सर्व कर्मचा-यांचे प्रस्ताव खाली जोडलेल्या विवरणपत्रामध्ये खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत खालील कागदपत्रांसह सादर करण्यात यावेत.

ए) या कार्यालयाने संबंधीत कर्मचा-याच्या नावे काढलेल्या आदेशाची प्रत.

बी) लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी **६ व्या वेतन आयोगाचे दिलेले** अंतिम वेतन प्रमाणपत्र.

सी) देय असलेल्या रक्कमेचे परिगणन.

**STATEMENT 1**
**STATEMENT SHOWING THE AMOUNT OF EARN LEAVE ENCASHMENT**

Name of the College – College Code –

| S. N. | Name of the Employee | Designation | Date of Retirement | Order No. & Date | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**ब) तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधनाची रक्कम –** आपल्या महाविद्यालयामध्ये विविध विषयांसाठी रिक्त असलेल्या पदांवर ज्या शिक्षक कर्मचा-यांची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आली होती त्याबाबत आपणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार देय ठरणारी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. परंतू

तरीदेखील अजूनही सन २०१९-२० पर्यंतची काही रक्कम देय असल्यास त्याबाबतची माहिती विहीत विवरणपत्रामध्ये खाली नमूद केलेल्या ठिकाणी, वेळेत व दिनांकास सादर करण्यात यावेत. सदरहू माहिती सादर करतांना यापूर्वी दिलेल्या सर्व सूचना विचारात घ्याव्यात.

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण वरील बाबींवरील आपले प्रस्ताव नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथील आर्टस बिल्डींगमधील खोली क्रमांक ४ येथे खाली नमूद केलेल्या तारखांना सादर करावेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ०८ जुलै, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | ०८ जुलै, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | अहमदनगर | ०९ जुलै, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| ४ | नाशिक | ०९ जुलै, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे